राज्यातील क्रीडा प्रबोधिनीतील पदे बाहयस्त्रोत यंत्रणेद्वारे भरण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-१७१४/प्र.क्र.१८८/क्रीयुसे-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक- २१ मार्च, २०१८.

<u>वाचा</u>-१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक:शाक्षिम १०९५/प्र.क्र.१६६/क्रीयुसे-३, दि.१८ नोव्हेंबर,१९९५
२) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्रमांक-पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/वित्तीय सुधारणा-१, दि.२ डिसेंबर,२०१३

<u>प्रस्तावना-</u>

प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेवून विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रशासकीय विभागाने शक्य असेल ते पदनिर्मिती न करता संबंधित कामे बाहय यंत्रणेकडून करुन घेणेबाबत संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये सूचित केले आहे. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेले कर्मचारी कालांतराने न्यायाधिकरण/न्यायालयातून आदेश मिळवून शासन सेवेत कायम होण्यासाठी प्रयत्न करतात व त्यांना नियमित वेतनश्रेणीवर घ्यावे लागते व त्यामुळे आवर्ती खर्चात मोठी वाढ होते. सदरची बाब लक्षात घेता संदर्भाधीन क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये क्रीडा प्रबोधिनीच्या संचालन व व्यवस्थापनासाठी निर्माण केलेल्या पदांवर करावयाची कर्मचा-यांची नियुक्ती बाहयस्त्रोत यंत्रणेद्वारा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

राज्यात क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्यासाठी निर्गमित केलेल्या दि.१८ नोव्हेंबर,१९९५च्या शासन निर्णयान्वये १४ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्यास मान्यता देऊन ती प्रबोधिनी चालविण्यासाठी सोबतच्या परिशिष्टामधील कर्मचारीवृंद मानधनावर भरण्यास परवानगी दिली होती. शासन या आदेशान्वये वित्त विभागाच्या दिनांक २डिसेंबर,२०१३ च्या शासन परिपत्रकानुसार सदर मंजूर पदे बाहय स्त्रोत यंत्रणेद्वारे भरण्यास मान्यता देत आहे.

२. सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद अनुक्रमांक १ ते ७ वरील पदे बाहयस्त्रोत यंत्रणेशिवाय भरणे आवश्यकअसल्याने ती खालील अटींच्या अधीन राहून भरण्याची कार्यवाही आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करावी.

I) प्राचार्य :- ६० पेक्षा जास्त खेळाडू असणाऱ्या क्रीडा प्रबोधिनीमध्ये प्राचार्याचे पद भरण्यात यावे.

II) प्रथमश्रेणी क्रीडा प्रशिक्षक नेमण्यासाठी आवश्यक खेळाडूंची संख्या खालीलप्रमाणे असेल तर त्यापुढे दर्शविल्याप्रमाणे क्रीडा प्रशिक्षकांची पदे भरण्यात येतील.

i. १६ ते ३० खेळाडू - ०१ क्रीडा प्रशिक्षक
ii. ३१ ते ५० खेळाडू - ०२ क्रीडा प्रशिक्षक
iii. ५१ ते ७० खेळाडू - ०३ क्रीडा प्रशिक्षक

III) सहायक मार्गदर्शक : - प्रत्येक मंजूर क्रीडा प्रकारासाठी २५ प्रशिक्षणार्थींसाठी १ याप्रमाणे सहाय्यक मार्गदर्शक नियक्त करावा.

IV) क्रीडा प्रबोधिनीमध्ये ४० पेक्षा जास्त खेळाडू संख्या असेल तरच फिजीओथेरेपिस्टचे पद भरण्यात यावे.

V) क्रीडा प्रबोधिनीमध्ये ५० पेक्षा जास्त खेळाडू संख्या असेल तरच स्पोर्टस् सायकॉलॉजिस्टचे पद भरण्यात यावे.

VI) क्रीडा प्रबोधिनीमध्ये ५० पेक्षा जास्त खेळाडू संख्या असेल तरच ०१ आहार सल्लागाराचे पद भरण्यात यावे.

VII) क्रीडा प्रबोधिनीमध्ये ४० पेक्षा जास्त खेळाडू संख्या असेल तरच ०१ वैद्यकीय अधिकारी हे पद भरण्यात यावे.

३. सोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.०८ ते १७ वरील पदे संदर्भाधिन क्रमांक २ च्या शासन निर्णयातील तरतूदींचा व विहित पध्दतीचा अवलंब करुन बाहयस्त्रोत यंत्रणेद्वारे खालील अटींचे पालन करुन भरावीत:-

I) वसतिगृह प्रमुख - प्रत्येक क्रीडा प्रबोधीनीकरिता एक वसतिगृह प्रमुख पद या प्रमाणे

II) स्टेनो (लघुलेखक) - पुणे येथील क्रीडा प्रबोधिनी मधील खेळाडू संख्या लक्षात घेता क्रीडा प्रबोधिनी,पुणे करिता एक स्टेनो (लघुलेखक) पद भरण्यात यावे.

III) वरिष्ठ लिपिक - क्रीडा प्रबोधिनी मध्ये १०० पेक्षा जास्त खेळाडू संख्या असेल तर ०१ वरिष्ठ लिपिकाचे पद या प्रमाणे.

IV) वाहनचालक - क्रीडा प्रबोधिनी करीता ०१ वाहन मंजूर असल्याने केवळ ०१ वाहनचालकाचे पद.

V) कनिष्ठ लिपिक - क्रीडा प्रबोधिनी ६० पेक्षा जास्त खेळाडू संख्या असेल तर ०१ कनिष्ठ लिपिकाचे पद या प्रमाणे.

VI) पहारेकरी - शा.नि.नुसार २८ पदे मंजुर आहेत तथापि २२ पहारेक-यांची पदे भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

VII) शिपाई - शा.नि.नुसार १४ पदे मंजुर आहेत तथापि ११ शिपायांची पदे भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

VIII) मैदानसेवक - २५ पेक्षा जास्त खेळाडू संख्या असणाऱ्या क्रीडा प्रबोधिनीकरीता ०१ मैदानसेवक आवश्यक तथापि सदर मैदानसेवकास सफाई कर्मचाऱ्याचे काम देखील पहावे लागेल.

IX) सफाईकामगार - २५ पेक्षा जास्त खेळाडू संख्या असणाऱ्या क्रीडा प्रबोधिनीकरीता ०१ सफाई कामगार आवश्यक तथापि सदर सफाई कामगारास मैदानसेवकाचे काम देखील पहावे लागेल.

X) मसाजिस्ट- १०० पेक्षा जास्त खेळाडू संख्या असलेल्या क्रीडा प्रबोधिनीसाठी ०१ मसाजिस्ट या प्रमाणे.

(उपरोक्त अ.क्र.VI व VII येथील पदे क्रीडा प्रबोधिनींचे व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने सुयोग्यरित्या विभागून नियुक्ती देण्याचे अधिकार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना राहतील.)

४. उपरोक्त परिच्छेद २ व ३ मधील अटी व शर्तींच्या अनुषंगाने पद भरती करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२११५३०१७३५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.21 15:32:37 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१.आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

२.संबंधित जिल्हाधिकारी

३.सर्व उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा(संचालनालयामार्फत)
४.सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी(संचालनालयामार्फत)
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२(लेखा व परिरक्षण), मुंबई/नागपूर
७. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई
८. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
९. जिल्हा कोषाधिकारी, पुणे
१०.वित्त विभाग, व्यय-११,
११.सर्व मंत्रालयीन विभाग
१२. सर्व विभागीय आयुक्त
१३. सर्व पालिका आयुक्त
१४. मा.मंत्री(शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे खाजगी सचिव
१५. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१६. मा.पालक मंत्री, सर्व जिल्हे
१७. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीयुसे-१/३,
१८. निवड नस्ती, क्रीयुसे-२

राज्यातील क्रीडा प्रबोधिनीतील पदे बाहयस्त्रोत यंत्रणेद्वारे भरण्याबाबत
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१७१४/प्र.क्र.१८८/क्रीयुसे-२, २१ मार्च, २०१८ सोबतचे
परिशिष्ट

अ.क्र.	पदनाम	१९९५ च्या शासन निर्णयान्वये मंजूर असलेली पद संख्या	प्रचलित मानधनाचे दरमहा दर
१	२	३	५
१	प्राचार्य	१४	रु. २५,०००/-
२	क्रीडा प्रशिक्षक	१४	रु. ३५,०००/-
३	सहाय्यक मार्गदर्शक	४१	रु. १५,०००/-
४	फिजीओथेरापिस्ट	१४	रु. १२,०००/-
५	स्पोर्टस सायकॉलॉजिस्ट	१४	रु. १२,०००/-
६	आहार सल्लागार	११	रु. १०,०००/-
७	वैद्यकीय अधिकारी	१४	रु. ८०००/-
८	वसतिगृह प्रमुख	१४	रु. ९०००/-
९	स्टेनो (लघुलेखक)	१	रु. ११,०००/-
१०	वरिष्ठ लिपिक	१४	रु. ११,०००/-
११	वाहन चालक	१४	रु. ९०००/-
१२	कनिष्ठ लिपीक	२८	रु. ९०००/-
१३	पहारेकरी	२८	रु. १५००/-
१४	मैदान सेवक	२८	रु. ७०००/-
१५	शिपाई	१४	रु. ७५००/-
१६	सफाई कामगार	१४	रु.१९२३/-
१७	मसाजिस्ट	१४	रु. ६०००/-
	एकूण	**२९१**	

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.21 15:33:02 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन